Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 3 | November – 2016

सुफी आणि संगीत कला

प्रा.संजय पत्की
संगित विभाग उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.



प्रस्तावना:-

सुरुवातीच्या काळात मुस्लीम सुलतानांनी इस्लाम धर्माच्या संगीतास निषेध केला. त्याचे कारण असे की, मोहम्मद साहब ने संगीत केवळ कुराणात व कौटुंबीक उत्सवा पुरतेच मर्यादित असावे असे सांगीतले.

परंतु जेव्हा सुलतान काजीने संगीत ईश्वरभक्तीसाठी आहे हे पटवून दिले तेव्हा मोहम्मद साहब प्रोत्साहित झाले व त्यांनी शाही दरबारात संगीतास प्रवेश दिला. हा पहिला प्रसंग होता की मुसलमानांनी संगीतास त्यांच्या धार्मिक क्षेत्रात प्रवेश दिला. सुफीच्या परिचयासाठी मुस्लीम धर्म म्हणजे काय? हे पाहू. इस्लामचा अर्थ आहे अल्लाह/देवाच्या प्रती समर्पणाची भावना आणि मुसलमान म्हणजे इस्लाम धर्माच्या नियमांचे पालन करणे. इस्लाम चे तीन अंग आहे.

१) ईमान :

अल्लाह त्याचे फरिश्ते (देवदूत) पैगंबर आणि राजेशुमार (अंतीम निर्णयाचा दिवस)
अर्थ : चांगले कामांसाठी प्रवृत्त तर वाईट कामांपासून दूर राहणे आणि आपल्या कर्तव्यपालनाचा आदर्श निर्माण करणे.

२) इबादत किंवा उपासना :

उपासना पद्धतीचे ५ अंग आहे.
१) अल्लाह शिवाय दुसरा ईश्वर नाही. मुहम्मद हे अल्लाह चे पैगंबर आहे.
''लाइलहा इल्लिल्लाह मुहम्मद उल रसूलल्लिह''
देव एक आहे. त्याच्याशिवाय कणी दुसरा नाही आणि मोहम्मद त्याचे रसूल (देवाचा दूत) किंवा पैगंबर आहे.
२) दिवसातून ५ वेळेस नमाज त्याचप्रमाणे शुक्रवारी दुपारी सार्वजनिक नमाज.
३) आपल्या कमाईतील अडिच हिस्सा दान करणे.
४) रोजा (उपवास १ महिना)
५) हज - जीवनामध्ये एक वेळेस मक्काला जाऊन येणे.

३) सुफी वाद :

सुफी वादाची व्याख्या करतांना असे म्हणता येईल की, ईश्वरीय प्रेम प्राप्तीसाठी स्वत:च्या देहाची त्यागाची भावना आणि कायम जीवन जगत असतांना ईश्वराची भक्ती करणे व त्याला प्रियकर मानून जीवापाड प्रेम करणे. सुफी पारशी भाषेतून आलेला आहे आणि फारशी मध्ये सुफी म्हणजे पाप न करणारा. सुफीवादी लोकांचा समज आहे की, जीतकी जास्त यातना त्यांना सहन करावी लागणार आहे तेवढे जास्त प्रेम त्यांना देवाकडून मिळणार आहे. अशा वेळी प्रियकराला आनंदी करण्यासाठी आपली भावना मांडण्यासाठी व प्रियकराला साद घालण्यासाठी सुफी लोक संगीताचा उपयोग करतात.

सुफीवादाचा जन्म इस्लाम नंतर झाला. आधी उल्लेख केल्याप्रमाणे संगीत केवळ कुराणात व कुटूंबीय उत्साहात एवढेच मर्यादित होते. परंतु जेव्हा सुलतान काजीच्या सांगण्यावरुन हे सिद्ध झाले की, संगीत केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर ते धार्मिक प्रचाराचे देखील साधन बनू शकते. इस्लाम स्थापना करण्यामागचा हेतू देखील हाच होता की, एकाच ईश्वराची भक्ती करुन त्यालाच पृथ्वीचा निर्माणकर्ता तसेच नष्ट करणारा मानणे. इस्लाम धर्माचे प्रणेते पैगंबर हजरत मोहम्मद होते. इस्लाम धर्माच्या विकासासाठी त्यांचे खुप प्रयत्न केले. पूर्वी अरब मध्ये ३६० काळया दगडांच्या मुर्तींचे पुजन केले जायचे. मोहम्मद साहब यांचा जन्म ५७० इत्यादीस. मध्ये मक्का मध्ये झाला. त्यांना ४० व्या वर्षी आत्मज्ञान झाले की, ते अल्लाह चे पैगंबर आहे आणि स्वत:ला नबी व रसूल (देवाचा दूत) म्हणून घोषीत केले. आणखी एक कथा अशी आहे की, जिब्राईल नावाच्या देवदूताकडून त्यांनी १० वर्षापर्यंत आपल्या मताचा प्रचार केला. मदिनामध्ये त्यांनी प्रथम मस्जिद बनवली. येथे दररोज सगळे धर्म अनुयायी ५ वेळेस सुरातालामध्ये नमाज म्हणायचे. कुराणाचा आधार घेऊन इस्लाम मत अवलंबीयांमध्ये बरेच मतभेद होते. त्यामुळे एक वर्ग मुल्ला-मौलवी यांचा जे मोहम्मद साहेबांचे चरित्रस्मरण आणि कुराणाचे पठण-पाठण यालाच इस्लाम धर्माचा मुळ आधार मानत होते.

दुसरा वर्ग धार्मिक चिंतन करणारे संत यांचा होता. जे वैयक्तिक साधना आणि अनुभती या आधारावर रुढीवादी धर्म आचरणाला सोडून प्रेमाच्या माध्यमातून परमानंदाचा मार्ग जनसाधारणामध्ये पसरवत होते.

सुफी जीवन पद्धती :

सुफी परंपरेनुसार सुफी विचारधारा मानणारे हे एक रहस्यमय जीवन जगत असतात. कधीही न पाहिलेल्या प्रियकराला त्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेऊन त्याला प्राप्त करण्यासाठी रात्रंदिवस त्याचीच भक्ती करत असतात. त्यांच्या परंपरेनुसार असे म्हटले जाते की, जेव्हा एखादा सुफी संत मरण पावतो तेव्हाच त्याच्या

जीवनातील परमानंद खरा मिळत असतो. कारण, एकदा देह त्यागल्या नंतरच ते आपल्या प्रियकरासोबत किंवा ईश्वरासोबत दाम्पत्य सुख्य उपभोगत असतात. अशावेळी एखाद्या सुफीच्या मरणानंतर त्याच्या मरणाचे दुःख न करता संगीतोत्सव साजरा केला जातो. या लोकांची जीवनपद्धती अतिशय रहस्यमय म्हणता येईल. त्यांना भौतिक सुखात रस नसतो. ते शरीरासाठी अवश्यक म्हणून शाकाहार घेत असतात आणि ते लोकांच्या घोळक्यापासून दूर जंगलामध्ये किंवा दर्ग्याजवळच म्हणजे आपल्या गुरुंच्या/पिरांच्या मजार जवळ राहणे पसंत करतात. यांचे कपडेही साधे असतात. जास्तीचे रंगबीरंगी कपडे हे लोक वापरत नाहीत. काळा आणि पांढरा हया दोनच रंगांना ते महत्त्व देत असतात. त्यामागचे रहस्य म्हणजे पवित्रतेचे प्रैतक आणि पैगंबरांच्या आवडीचा रंग म्हणजे पांढरा रंग होय आणि काळा रंग वापरण्यामागचे कारण म्हणजे मक्क्याला चढविण्यात आलेल्या चादरीचा रंग म्हणजे काळा रंग. त्यामुळे काळया रंगाचे महत्त्व ते अधिक मानतात. उत्सवाचे किंवा ''समाअ'' चे ठिकाणही दर्गाच म्हणतात येईल. हे लोक मानवतेचा संदेश देतात.

सुफी रहस्यवाद :

सुफी रहस्यवादाचा जन्म वहादातुलवुजूद यांवर आधारीत आहे. अर्थात वहदत म्हणजे एकता, उल म्हणजे समन्वय आणि वुजूद म्हणजे अस्तित्व. सुफी लोक ईश्वरासोबत सरळ संपर्क साधण्यासाठी आतुर असतात. आत्म्याद्वारे परमात्म्यात लीन होण्याच्या क्रियेवर विश्वास ठेवतात. अशा स्थितीला ''मारिफात'' किंवा ''वस्ल'' म्हणजे एकीकरण म्हणतात. परमात्म्यापर्यंत पोहचण्यासाठी त्यांना १० अवस्थांना पार कराव्या लागतात.

१) तौबा (पश्चाताप)
२) वारा (विरक्ती)
३) जुहद (पवित्रता)
४) फक्र (निर्धनता)
५) सब्र (धैर्य)
६) शुक्र (आभार)
७) खौफ (भय)
८) रजा (आशा)
९) तब्बकुल (संतोष) आणि
१०) रिजा (ईश्वर इच्छा)

वैयक्तीक साधना आणि अनुभती यावर आधारीत सुफी साधना पद्धतीचे दर्शन घडविणारे संत यामध्ये प्रथम नांव हे ८ वी शताब्दी ची महिला संत रबीया (७१८-८३१ ई.) ला मानले जाते. (प्रो. मॅकडोनाल्डच्या मते) तीने निवडलेल्या ईश्वरीय प्रेम प्राप्तीच्या आध्यात्माच्या या मार्गाला तीच्या पाठोपाठ शेख जुनैक बगदादी ने प्रशस्त केले आणि सन ९२२ ई. मध्ये हुसैन बीन मन्सुर ने केलेल्या आव्हानाने या मार्गाला मजबत केले. त्याने केलेल्या आव्हानानुसार सत्य एक आहे व जो त्याला जानतो तो आपल्या ईश्वरासोबत एकरुप, एकाकार होतो. आध्यात्मिक साधना पथाला अलगजली (सन १०५५ - १११११ ई.) ने साहित्यीक रुप दिले.

सुफींचे दोनच लक्ष होते. एक आपल्या आध्यात्मिक प्रगती करणे आणि दुसरे म्हणजे इस्लाम आणि मानवतेची सेवा करणे. आपल्या लक्ष प्राप्तीसाठी सुफी स्वेच्छेने भौतिक जीवन परित्याग करुन निर्धनता, शाकाहारी, शांती आणि अहिंसेचे पालन करत होते. त्यांचा गुरुशिष्य परंपरेमध्ये देखील विश्वास होता. गुरुला पिर किंवा शेख म्हणज होते. जो ईश्वरापर्यंत पोहचवण्याचा मार्ग दाखवित होता. ईश्वराप्रती प्रेम हे संगीत आणि भक्तीपर कविता यांच्याद्वारे प्रकट केले जात होते. सुफी जीवनामध्ये संगीताचे एवढे महत्त्व होते की, जेव्हा दोन वृद्ध मंडळी एकमेकांना भेटायचे तेव्हा जेवणाच्या कार्यक्रमाबरोबर (समाअ) म्हणजे ईश्वराचे स्मरण, गुणकथा किर्तनाला जीक्र म्हणतात. जीक्र करत असतांना ते अलौकीक रहस्यामध्ये लीन होत असत. यालाच शायर बेखुरी म्हणतात. जीक्र मध्ये ईश्वराचे, रसूलचे नामस्मरण, चिंतना व्यतिरिक्त इस्लामच्या ५ अनिवार्य कर्तव्य (कलमा, नमाज, रोजा, हज आणि जकात) यांचे देखील वर्णन असते. आणखी एक शब्द आहे जारी ज्याचा शाब्दीक अर्थ आहे साद घालणे किंवा विनंती. काही सुफी फकीरांनी जीक्र आणि जारी दोन्ही गेय रचनांना महत्त्व दिले आहे.

सुफी वर्गाने केलेली संगीत सेवा :

सुफी वर्ग केवळ ईश्वर भक्तीच करत नव्हते तर ते दुर्मिळ स्वरुपाचे आध्यात्मिक साहित्य रचत होते, आपले शिष्यवर्ग तयार करत होते. सुफी वर्ग हा संगीत प्रेमी होता. त्यांच्या भक्तीचे साधन संगीत आणि त्यांनी रचलेले उच्च कोटीचे साहित्य हे होते. असे म्हणतात येईल की, सुफी वर्गाने गायनाच्या किंवा साहित्याच्य माध्यमातून खुप मोठे योगदान संगीतामध्ये दिलेले आहे. कधी उच्च कोटीचे शायर बनून, कधी उत्कृष्ट संगीतज्ञ बनून तर कधी पृथ्वीवर असून गायनाच्या माध्यमातून स्वर्गापर्यंत जोडणारा दुवा बनून कुठल्या न कुठल्या प्रकारे संगीतामध्ये त्यांनी फार मोठे योगदान दिले आहे. त्यापैकी काही सुफी ज्यांनी संगीतामध्ये खुप मोठया प्रमाणावर योगदान दिलेले आहे. ते खालीलप्रमाणे . . .

हजरत ख्वॉजा शेख मोईनुद्दीन चिश्ती :

भारतामध्ये सुफी विचारधारा तसेच साधना पद्धतीचा प्रचार हजरत ख्वॉजा मोईनुद्दीन चिश्तीद्वारे ११८६ ई. मध्ये झाला. असेही म्हटले जाते की, जेव्हा हजरत साहेबांनी पाहिले की, त्यांचा समाज देवाची भक्ती सोडून विजय प्राप्त करण्यासाठी हिंसा करत आहेत व विजय प्राप्त झाल्यावर संगीतोत्सव साजरा करत आहे. ते मद्यपानही करत आहेत. जे धर्मानुसार पाप आहे. समाजाची ही अवस्था पाहून साहेबांनी पहिल्यांदा हातात डफ घेऊन एक कव्वाली सादर केली व हळूहळू लोकांना आपल्या ईश्वराची महती त्यांच्या गायनातून सांगत-सांगत त्यांनी धर्माचा प्रचार प्रसारही केला व सामान्य जनतेला जीवनाविषयी योग्य ते मार्गदर्शन देखील केले. हळूहळू बराचसा वर्ग त्यांच्या आज्ञांचे पालन करु लागला. आज रोजी आपण पाहू शकतो की, हजरत साहेबांच्या भेटीसाठी लाखो भक्त हे अजमेरला त्यांच्या दर्ग्यावर नतमस्तक होतात.

शेख मोईनुद्दीन चिश्तीच्या आधी सन १००५ ई. शेख इस्माईल, शहा सुलतान समी, अबुल्लाह सन १०६५ ई. आणि दातागंज बक्श सन १०७२ ई. मध्ये भारतामध्ये येऊन स्थायीक झाले होते. प्रेम आणि सद्गुण यांच्याद्वारे लोकांची मने जिंकत होते.

निजामुद्दीन औलिया : (जन्म - १२३६ बदायु)

२५ वर्षांचे असतांना हजरत निजामुद्दीन हे गयासुद्दीन बलबलच्या शासन काळात दिलेला आहे. गयासपुरा येथे (निजामुद्दीन रेल्वे स्टेशन, नवी दिल्ली) त्यावेळी त्यांचे समकालीन प्रसिद्ध धर्माचार्य हजरत फरीदुद्दीन ११७३ ते १२६५ कडून त्यांनी फकीरीची दिक्षा दौलत प्राप्त केली. असे म्हटले जाते, जेव्हा बंगालवर विजय प्राप्त करुन गयासुद्दीन तुगलक जेव्हा परत येत होता तेव्हा त्याने हजरत साहेबांना दिल्ली सोडण्याचा आदेश पाठविला होता. तेव्हा त्यांनी देखील गयासुद्दीन साठी एक संदेश पाठविला होता की, (दिल्ली हनोज दुरुस्त) म्हणजे दिल्ली अजून दूर आहे आणि असा विश्वास केला जातो की, याचेच फल स्वरुप जेव्हा गयासुद्दीनने

दिल्लीमध्ये पुर्णपणे प्रवेशही केला नव्हता तोवर मोहम्मद बीन तुकलङ्ग ने त्याला षडयंत्र रचून मारुन टाकले. तेव्हा पासून (दिल्ली अजून दूर आहे) किंवा (दिल्ली अभी दूर हैं) ही लैंकोक्ती प्रसिद्ध झाली. यांनी ज्या सुफी पंथाची स्थापना केली त्याला निजामी असे म्हटले जाते. यांनाही संगीताचा उपयोग करत असतांना खुप विरोध सहन करावा लागला. तरीही हजरत साहेबांनी समाअ प्रथा कायम चालुच ठेवली. (मेहमूद अख्तर रशीद) यांच्या (तारीखे-हिंदी के हवाले) मध्ये उल्लेख केला आहे की, हजरत साहेबांच्या आश्रमात ३००० विद्वान आणि विद्यार्थी तर राहत होतेच आणि त्यांचे कव्वाल शिष्यांची संख्या ही २०० पर्यंत होती. हजरत निमामुद्दीन औलिया यांचे उपनाम (हजरत सुलतानजी) होते. दिल्ली मध्ये त्यांची मजार आहे व ते दरवर्षी उर्स चा कार्यक्रम आयोजित केला जातो आणि हजरत साहेबांबद्दल महत्त्वचाचे म्हणजे ते फरशीचे उच्च कोटीचे विद्वान, उत्तम संगीतज्ञ आणि वलीकामील म्हणजे (देवासोबत बोलण्यायोग्य) सुफी संत होते. आणखी महत्त्वाचे म्हणजे भारतीय संगीतामध्ये ज्यांचे खुप मोठे योगदान आहे असे अमिर खुसरो यांचे गुरु म्हणजे सुलतानजी होय.

अबुल हसन : (जन्म - उत्तर प्रदेश पटियाला, जि. एटा मध्ये सन १२५४ ई. पुर्ण नांव - अबुल हसन, किताब - अमिर आणि उपनाव - खुसरो)

भारतीय संगीतामध्ये ज्यांचे खुप मोठे योगदान आहे असे अमिर खुसरो १२ व्या वर्षापासूनच कविता करत होते. सर्व प्रकारची शिक्षा त्यांनी आपले गुरु हजरत सुलतानजी यांच्या कडून प्राप्त केली. अरबी, फारसी, हिंदी, तुर्की सोबत अनेक भाषंचे जाणकार आणि साहित्यकार होते. कुतूबुद्दीन ऐबक गुलाम, अलाउद्दीन खिलजी व मोहम्मद तुगलक तीनही वंशाचे शासन युग यांनी पाहिले. सन १३२५ ई. मध्ये दिल्लीला आपले गुरु हजरत सुलतानजी यांच्या विरहामध्ये स्वर्गवास केला. हजरत सुलतानजीच्या मजार शेजारीच अमिर खुसरो यांची मजार आहे. जेथे दरवर्षी भव्य उर्स व संगीतोत्सव साजरा करण्यात येत असतो.

नृत्याचा आविष्कार :

सुफींच्या साधनेचे आणखी एक माध्यम म्हणजे विशिष्ट प्रकारचे नृत्य होते. नृत्य देखील त्यांच्या साधनेचे अंग होते. नृत्याचा उपयोग साधनेसाठी ज्यांनी केला त्यामध्ये ज्यांचे प्रथम नाम येते असे व्यक्ती म्हणजे मौलाना रुमी.

मौलाना रुमी :

पूर्ण नांव : जलाजुद्दीन बहाउद्दीन आहे. (सन १२६० ई. बल्ख) वर्तमान मध्ये अफगणीस्तान येथे जन्माला आले. वेगवेगळया देशांमध्ये भ्रमण करुन कनिया (तुर्की) येथे आले. त्यांना त्यावेळी रुम म्हटले जात होते. त्यामुळे मौलाना यांच्या नावामध्ये रुमी शब्द जोडण्यात आला. मौलाना रुमीच्या जीवनातील एक प्रसंग आहे जेथे आपल्याला कळते की, नृत्याची प्रथा सुर्फीमध्ये सुरु झाली. शेख सलाहउद्दीन जरकौब, सोने-चांदी चे वर्क कुटणाचे काम करते असे. जे रुमीचे गुरुबाही होते. एङ्ग दा ते सोने कुटत असतांना हातोडीने जेव्हा सोन्यावर आघात करत होते तेव्हा त्या कुटण्याच्या क्रियेत संपूर्ण वातावरणात एक मध्यून ध्वनी लहर उठत होती. त्यात कमालीचे लय होते. नैसर्गिक निर्माण झालेल्या संगीतामध्ये धुंद होऊन मौलाना रुमी नाचायला लागले. ते कुठल्याही प्रकारचे शास्त्रशुद्ध नृत्य नव्हते. पण देवाचे स्मरण करत असतांना झालेली बेधुंद अवस्था होती. त्यांचे नृत्य पाहून सलाहउद्दीन ही आपला हात थांबवू शकत नव्हता. आणि हाच पहिला प्रसंग होता जेव्हा सुफी साधनेत नृत्याचा आविष्कार झाला.

सुफी काव्य :

सुफी कला हे अरबी, फारसी, ब्रीज किंवा उर्दू भाषेतच अधिक असतात. गद्य आणि पद्य दोन्ही प्रकारांमध्ये सुफी कला उपलब्ध आहे. साहित्याच्या माध्यमातून संगीतास उपयोगी अशा प्रकारचे हे कलाम किंवा काव्य असतात. खाली काही उदाहरणे आहेत. ज्यावरुन सिद्ध होते की, सुर्फींचे संगीतातील योगदान किती मोलाचे आहे.

अमिर खुसरो यांचे अजरामर काव्य आहे. त्यातील दोन ओळी पाहू.

छाप तिलक सब छिनलीं, मोसे नैना मिलाईके,
अपनीसी रंगदिनी, मोसे नैना मिलाईके।
खुदा अपने फरिश्ते ना भेज दुनियाँमें, मैं आदमी हूँ फरिश्तो के साथ कैसे रहू।
(शायर गुमनाम)
मैं वो नही हूँ हरगीज, वो मैं नही हैं लेकीन,
वो मुझको मुकद्दरके, खुदको बता रहे है।
(हजरत गौसी शहा)

निष्कर्ष :

सुर्फींचा अभ्यास करतांना असे लक्षात येते की, त्यांनी केलेली साधना पद्धती आजच्या काळाची गरज आहे. म्हणजे शास्त्रशुद्ध गायन करत असतांना बेधुंद नृत्य करणे किंवा साधनेमध्ये लीन होऊन गायन करणे म्हणजे पृथ्वीवर स्वर्गाची अनुभती करणे व करुन देणे हे केवळ सुफी पद्धतीचा, साहित्याचा, गायनाचा आणि नृत्याचा अभ्यास केल्यावरच शक्य होईल. संगीताने आपल्याला आनंद तर मिळतच असतो पण जर त्याला आध्यात्माची संगत मिळाली तर मानसिक समाधानही मिळेल. संगीत शिकत असतांना केवळ आलाप, तान, राग विस्तार किंवा राग गायन करुनच गायन श्रेष्ठ ठरत नाही तर त्यामध्ये भाव उतरण्यासाठी आध्यात्म महत्त्वाचे ठरते.

म्हणून शास्त्रीय संगीत शिकत असतांना धर्माचा अभ्यासही शिकवला जावा व आध्यात्याचे धडे शिकवून गळयाने गाणारा व कानांवर आधात करणारा गायक नव्हे तर मनापासून गाऊन आत्म्यापर्यंत पोहचवणारा गायक निर्माण व्हावा.

संदर्भ :

१) भारतीय सफीयैंकी संगीत सेवा
२) इस्लाम धर्म एवं संगीत
३) http:llislam.uga.edu/sufismintro.html